सकाळ टुडे २१-०१-२०२२
पान नं-9.

देड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध

f SakalNews @Saka

सकाळ

# विजया वाडेकरची शिबिरासाठी निवड



विजया वाडेकर

कोरेगाव : दावणगिरी (कर्नाटक) विद्यापीठ परिसरात सुरू झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक विजया वाडेकर सहभागी झाली आहे. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेतील पाच विद्यार्थी व पाच विद्यार्थिनी स्वयंसेवक आणि एक संघ व्यवस्थापक असा ११ जणांचा संघ या शिबिरात सहभागी झाला आहे. त्यात विजयाचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदींनी विजयाचे अभिनंदन केले. प्रा. डी. डी. पाटील, प्रा. एन. एम. गोसावी यांचे तिला मार्गदर्शन मिळाले.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव